मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 01 जुलै 2026 | पान- 1

# मोठ्या सोसायट्यांचा ओला कचरा महापालिका उचलणार

## 1 जुलैपासून बंदीच्या निर्णयावर माघार; सोसायटीधारकांच्या विरोधानंतर आयुक्त व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील निर्णय घेणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील दररोज शंभर किलोहून अधिक कचरा निर्माण होणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्या, मंगल कार्यालये, वसतीगृह, कंपन्या, खाणावळींचा उद्यापासून (एक जुलै) ओला कचरा न स्वीकारण्याच्या निर्णयावरुन महापालिका प्रशासनाने एक पाऊल मागे टाकले आहे. ओला कचरा तूर्तास उचलला जाईल. पदाधिकारी आणि आयुक्तांशी चर्चा करुन पुढील पाऊले उचलली जाणार असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.



केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केला आहे. त्यानुसार दररोज शंभर किलो कचरा निर्माण करणाऱ्या कोणत्याही आस्थापना, वीस हजार चौरस मीटर पेक्षा अधिक क्षेत्रफळ असणाऱ्या आस्थापना, दररोज ४० हजार लीटर किंवा त्यापेक्षा जास्त पाण्याचा वापर करणाऱ्या आस्थापनांना हा नियम लागू होतो. अशा आस्थापनांना त्यांच्या आस्थापनेत निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याची विल्हेवाट त्यांच्याच आवारात कंपोस्टिंग, बायोमिथनायझेशनद्वारे लावणे बंधनकारक केले आहे. त्याची केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्या आस्थापनांना ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प प्रमाणित करून घेऊन तसे प्रमाणपत्र महापालिकेकडून प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे सोसायटी व इतर आस्थापनांत तयार झालेला कचऱ्याची आपल्याच आवारातील खत प्रकल्पात विल्हेवाट लावणे बंधनकारक केले आहे.

या नियमांची कडक अंमलबजावणी करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला होता. मोठ्या सोसायट्यांनी ३० जूनपर्यंत आपल्या आवारात कंपोस्ट खत प्रकल्प उभारावा. अन्यथा एक जुलैपासून महापालिका या सोसायट्या व आस्थापनांकडून ओला कचरा घेणार नाही. दंडात्मक व फौजदारी कारवाई करेल, असा इशारा दिला होता. यासाठी सोसायटीधारकांबरोबर बैठकही घेतली. मात्र, सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी ओला कचरा उचलणार नाही, या महापालिकेच्या भूमिकेला जोरदार विरोध केला. कचरा उचलणार नसाल, तर महापालिकेत आणून टाकू, असा इशाराही दिला होता. अखेर महापालिका प्रशासनाने तूर्तास ओला कचरा उचलणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शंभर किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांचा एक जुलैपासून ओला कचरा उचलणार नाही, असा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, याला सोसायटीधारकांनी विरोध केला. त्यामुळे सोसायटीधारकांचा ओला कचरा तूर्तास उचलण्यात येणार आहे. पुढील निर्णय आयुक्त आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून घेतला जाईल, असे आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### शंभर किलो कचरा निर्माण करणाऱ्या १,१९५ आस्थापना

**» शहरात दररोज शंभर किलोपक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्या मोठ्या सोसायट्या व आस्थापनांची संख्या एक हजार १९५ आहे. या आस्थापनांमध्ये ओला कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया आहे की नाही, याचे सर्वेक्षण आरोग्य विभागाने सुरू केले आहे. या सर्वेक्षणानंतर ज्या सोसायट्यांमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची यंत्रणा आहे, त्यांच्यावर पहिल्या टप्प्यात लक्ष केंद्रित करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

---

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सात अधिकारी-अंमलदार सेवानिवृत्त...

## नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त; कुटुंबीयांच्या उपस्थितीत शाल, स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्र देऊन गौरव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील नियत वयोमानानुसार सात पोलीस अधिकारी व अंमलदार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सत्कार व निरोप समारंभ मंगळवारी आयुक्तालयातील 'शिवनेरी हॉल' येथे पार पडला.



पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सहायक पोलीस आयुक्त सतीश नांदूरकर, दिक्षक साळुंके, पोलीस निरीक्षक शंकर डामसे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शांताराम उमे, रामदास नरवडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक उन्मेश जोशी आणि पोलीस हवालदार राजू केदारी यांचा कुटुंबीयांसह सत्कार करण्यात आला.

त्यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्हे, सेवानिवृत्ती प्रमाणपत्र, ओळखपत्र, शुभेच्छापत्र, रोप व भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उपआयुक्त गणेश इंगळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व कुटुंबीय उपस्थित होते.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती

**» पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उपआयुक्त गणेश इंगळे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि सेवानिवृत्तांच्या कुटुंबीयांची उपस्थिती होती. पोलीस दलातील सेवाभाव, कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिक कार्याचा गौरव करण्याची परंपरा कायम ठेवत हा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना निरोगी, आनंदी आणि यशस्वी पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.**

# “गांधर्व मंच” आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न

## आमदार महेश लांडगे यांचा सभागृहात औचित्याचा मुद्दा, 32 लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न विधानसभेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या“गांधर्व मंच”आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याला ग.दि.मा. नाट्यगृह, निगडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्नता लाभली. संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या वैकुंठगमन सोहळा, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सव वर्ष आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या १२५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते



कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य शरदचंद्र पवार, खासदार श्रीरंग बारणे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, प्रसिद्ध गायक-संगीतकार अवधूत गुप्ते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर “भक्ती सिम्फनी” या संत अभंगांवर आधारित भारतीय व पाश्चात्य वाद्यांच्या सुरेल संगमातून साकारलेल्या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. “सुंदर ते ध्यान”, “विष्णुमय जग”, “देवाचिये द्वारी”, “ओम नमो ज्ञानेश्वरा” आदी अभंगांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले

या स्पर्धेत संतरचित अभंग गायन, शास्त्रीय गायन, तबला सोलोवादन आणि पखवाज सोलोवादन या विभागांचा समावेश होता. भारतातील विविध राज्यांसह परदेशातील चार देशांतील एकूण ५७९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला, तर अंतिम फेरीसाठी २३४ स्पर्धकांची निवड करण्यात आली होती. अंतिम फेरी चिखली येथील संतपीठात पार पडली असून त्यातून ६४ स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

प्रास्ताविकात संतपीठाचे संचालक अभय टिळक यांनी स्पर्धेचा आढावा सादर केला. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संतांच्या विचारांचा वारसा संतपीठाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरू असल्याचे सांगितले. डॉ. सदानंद मोरे यांनी वारकरी संप्रदाय हा कला आणि ज्ञानाचा संगम असल्याचे नमूद करत या स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले. खासदार श्रीरंग बारणे यांनी संतपरंपरेचे विचार समाजासाठी आजही मार्गदर्शक असल्याचे सांगितले.

यावेळी अवधूत गुप्ते यांनी आपल्या बालपणीच्या सांगीतिक आठवणींना उजाळा देत संतपीठाच्या कार्याचे कौतुक केले. तसेच अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे रजिस्ट्रार विश्वास जाधव यांनी मंडळाच्या सांगीतिक परंपरेची माहिती देत स्पर्धा आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला.

अध्यक्षीय भाषणात शरदचंद्र पवार यांनी संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्राण असल्याचे सांगत वारकरी परंपरेने सामाजिक लोकशाहीची पायाभरणी केल्याचे प्रतिपादन केले. ज्ञानेश्वरीमुळे ज्ञानाचे लोकशाहीकरण झाले, तर तुकाराम महाराजांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. या संतपरंपरेसोबत गांधर्व परंपरेने कलेचे लोकशाहीकरण केल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्राची खरी ओळख ज्ञान, समता, करुणा आणि संस्कृतीच्या अखंड परंपरेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन संतपीठाच्या वतीने करण्यात आले. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### ‘गांधर्व मंच’ला जागतिक प्रतिसाद

**» पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘गांधर्व मंच’ आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेला देश-विदेशातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारतातील विविध राज्यांसह परदेशातील चार देशांतील एकूण ५७९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. अंतिम फेरीसाठी २३४ स्पर्धकांची निवड करण्यात आली होती. चिखली येथील संतपीठात झालेल्या अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ६४ स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या स्पर्धेमुळे भारतीय शास्त्रीय संगीत आणि संतपरंपरेचा जागतिक स्तरावर प्रसार झाला.**

# चिखलीतील पिंगळे रस्त्यावरील विद्युत फीडर बॉक्स ठरतोय धोकादायक

## सत्संग भवनासमोर रस्त्यालगत असलेल्या फीडर बॉक्समुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताचा धोका; नागरिकांची प्रशासनाकडे त्वरित कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली परिसरातील पिंगळे रस्त्यावर सत्संग भवन समोर असलेला विद्युत फीडर बॉक्स सध्या वाहतुकीसाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे. हा विद्युत फीडर तातडीने रस्त्यावरून मागे सरकवून बाजूला सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावा, तसेच पावसाळ्यापूर्वी या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे तातडीने योग्य ती कारवाई करावी अशी मागणी देखील नागरिकांनी केली आहे.



या परिसरात नागरिकांची आणि वाहनांची नेहमीच मोठी वर्दळ पाहायला मिळते. त्यातच सत्संग भवनात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या वेळी येथे येणाऱ्या भाविकांची आणि वाहनांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढते. मात्र, सद्यस्थितीत सदर विद्युत फीडर बॉक्स अगदी रस्त्याला लागून असल्यामुळे येथून जाणाऱ्या वाहनांना, विशेषतः वळण घेताना मोठ्या अडथळ्याला सामोरे जावे लागत आहे. या अरुंद आणि वर्दळीच्या जागेत फीडर बॉक्सच्या अडथळ्यामुळे वारंवार मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत असून, या ठिकाणी गंभीर अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

या त्रासामुळे स्थानिक रहिवासी, नियमित वाहनधारक आणि सत्संग भवनात येणाऱ्या भाविकांनी संताप व्यक्त केल्या आहे नागरिकांची सुरक्षा आणि परिसरातील वाहतूक सुटसुटीत राखण्याचा विचार करून महापालिकेच्या संबंधित विभागाने या जागेची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करणे गरजेचे आहे. प्रशासनाने या कामाला प्राधान्य देऊन तात्काळ योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी देखील केली जात आहे.

**"पिंगळे रस्त्यावरील सत्संग भवनसमोरील विद्युत फीडर बॉक्समुळे नागरिकांच्या सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. वळणावरच हा बॉक्स असल्याने वाहनचालकांना अंदाज येत नाही, ज्यामुळे दररोज अपघाताचा धोका संभवतो.  कोणत्याही दुर्घटनेची वाट न पाहता हा फीडर बॉक्स तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावा. या अन्यथा आम्हाला नागरिकांच्या हक्कासाठी तीव्र भूमिका घ्यावी लागेल”**

**- यश साने,नगरसेवक**

# पुण्याच्या पूर्वोत्तर भागात पुढील आठवड्यापासून नवे वेळापत्रक

## धरणात केवळ 2.19 टीएमसी पाणीसाठा शिल्लक; येरवडा, विश्रांतवाडी, लोहगाव, धानोरी, विमाननगर, वडगावशेरीसह अनेक भागांना फटका

**पुणे | प्रतिनिधी**

भामा-आसखेड पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा केल्या जाणाऱ्या शहराच्या पूर्वोत्तर भागातही आता पुढील आठवड्यापासून दिवसाआड पाणी पुरवठा केला जाणार आहे. भामा-आसखेड धरणात केवळ २.१९ टीएमसी पाणी शिल्लक आहे. तसेच, धरणाने तळ गाठला आहे. तसेच, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जून महिना संपूर्ण कोरडा गेला आहे.

त्यामुळे हे पाणी आणखी काही महिने शिल्लक राहावे यासाठी पक्षनेत्यांच्या सोमवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिली. त्यासाठी प्रशासनाकडून लवकरच या भागासाठीचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे. या योजनेतून शहरातील येरवडा, विश्रांतवाडी, लोहगाव, कळस, धानोरी, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, विमाननगर, खराडीचा काही भाग, वडगावशेरी, फुलेनगर, वाघोलीचा काही भागाला पाणी दिले जाते.

भामा-आसखेड पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा केल्या जाणाऱ्या शहराच्या पूर्वोत्तर भागातही आता पुढील आठवड्यापासून दिवसाआड पाणी पुरवठा केला जाणार आहे मागील महिनाभरापासून भामा-आसखेड धरणातून गढूळ पाणी दिले जात असल्याने महापालिकेने या भागातील लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन या भागात पाणीकपात लावली नव्हती. मात्र, आता धरणातील पाणी वेगाने कमी होत असल्याने तसेच गाळाचे प्रमाण वाढत असल्याने दिवसाआड पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी या योजने अंतर्गत नव्याने बांधलेल्या टाक्या लवकरच सुरू केल्या जाणार असल्याचे प्रशासनाने यावेळी बैठकीत सांगितले.



### कोणत्या भागात होणार दिवसाआड पाणीपुरवठा?

» भामा-आसखेड पाणीपुरवठा योजनेतून पाणी मिळणाऱ्या शहराच्या पूर्वोत्तर भागात पुढील आठवड्यापासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू होणार आहे. या निर्णयाचा येरवडा, विश्रांतवाडी, लोहगाव, कळस, धानोरी, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, विमाननगर, खराडीचा काही भाग, वडगावशेरी, फुलेनगर आणि वाघोलीच्या काही भागांतील नागरिकांवर परिणाम होणार आहे. या भागांसाठी स्वतंत्र वेळापत्रक महापालिकेकडून जाहीर करण्यात येणार असून, नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### उशिरा लागू झाली पाणीकपात

» भामा-आसखेड योजनेतून मागील महिनाभर गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने या भागातील नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे महापालिकेने इतर भागांप्रमाणे तातडीने पाणीकपात लागू केली नव्हती. मात्र, धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने अखेर या भागातही दिवसाआड पाणीपुरवठा लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच नव्याने उभारण्यात आलेल्या जलटाक्या लवकरच कार्यान्वित करून पाणीपुरवठा अधिक प्रभावी करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

### धरणातील पाणीसाठा चिंताजनक

» भामा-आसखेड धरणात सध्या केवळ २.१९ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असून धरणाने तळ गाठला आहे. जून महिन्यात पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस न झाल्याने नवीन पाण्याची आवक झाली नाही. त्यातच धरणातील गाळाचे प्रमाण वाढल्यामुळे पाणी उपसा करणे अधिक कठीण बनले आहे. उपलब्ध पाणीसाठा पुढील काही महिने पुरवा यासाठी महापालिकेने दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घेतला असून, पाण्याचे नियोजन अधिक काटेकोरपणे केले जाणार आहे.

# पुण्यात कृत्रिम पाऊस पाडणार? धरणांनी तळ गाठल्याने महापालिकेचा मोठा प्लॅन...

## राज्यातील कृत्रिम पावसाच्या प्रयोगांचा अभ्यास करण्याचे आदेश; खर्चासह यशस्वितेच्या दराबाबत आयुक्त सादर करणार सविस्तर अहवाल.

**पुणे | प्रतिनिधी**

एकीकडे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांनी तळ गाठला आहे. दुसरीकडे जून महिना संपत आला तरी मोसमी पावसाने दडी मारली आहे. यामुळे शहरावरील पाणीसंकट गंभीर होत असल्याने पावसाची अनिश्चितता लक्षात घेवून आता महापालिकेने धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कृत्रिम पाऊस पाडण्यासंदर्भात चाचपणी सुरू केली आहे.

पालिकेच्या सोमवारी झालेल्या पक्षनेत्यांच्या बैठकीत कृत्रिम पावसासंदर्भातील संपूर्ण तांत्रिक माहिती तातडीने गोळा करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिल्याची माहिती महापौर मंजुषा नागपुरे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली दिली. सभागृह नेते गणेश बिडकर यावेळी उपस्थित होते. महापौर म्हणाल्या की, सध्या धरणांमध्ये केवळ ३.६० टीएमसी पाणी शिल्लक आहे.

हा साठा पुणेकरांना जेमतेम दोन महिने पुरेल एवढाच आहे. जून महिना संपत आला तरी खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अद्याप पावसाला जोर नाही. त्यामुळे, यंदा धरणे न भरल्यास शहरावर मोठे पाणीसंकट येणार आहे. त्यामुळे शहराला पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी प्रायोगिक तत्त्वावर कृत्रिम पाऊस पाडता येईल का, याबाबत सर्वपक्षीय गटनेत्यांमध्ये चर्चा करण्यात आली. यापूर्वी राज्यात बारामतीमध्ये असा प्रयोग करण्यात आला होता.



### तातडीनं कारवाई करा ..

» या बैठकीत महापालिकेने शहरात पाणीबचतीसाठी तातडीनं कारवाई करण्याच्या सूचनाही दिल्या. मागील आठवडयात महापालिकेने शहरात वॉशिंग सेंटर, जलतरण तलाव बंद करण्याचे आदेश काढले होते. तसेच बांधकामांच्या ठिकाणीही पिण्याचे पाणी वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यानंतरही राजरोसपणे पिण्याचे पाणी वापरले जात असल्याने तातडीनं कारवाई करून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आल्याचे बिडकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

ही बाब लक्षात घेऊन यापूर्वी देशात किंवा राज्यात कृत्रिम पावसाचे प्रयोग कुठे राबविण्यात आले, ते कितपत यशस्वी ठरले, हा प्रयोग करण्यासाठी कोणत्या नामांकित संस्थांची मदत घेता येईल, कृत्रिम पावसाचा यशस्वी होण्याचा दर किती आहे, त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, तसेच शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणसाखळी परिसरात कृत्रिम पाऊस पाडून शहराची पाण्याची गरज भागविता येऊ शकते का, या सर्व मुद्द्यांवर सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश आयुक्तांना दिले आहेत.

# ‘एचएसआरपी’कडे निम्म्या वाहनधारकांची पाठ

## जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने दिलेली अंतिम मुदत (30 जून) संपत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी देण्यात आलेली सहावी मुदत आज (३० जून) संपणार असून, अद्याप ५३ टक्के वाहने ‘एचएसआरपी’ विनाच असल्याचे समोर आले आहे.

आतापर्यंत पुणे प्रादेशिक परिवहन विभागातील नऊ लाखांहून अधिक गाड्यांनी ‘एचएसआरपी’ पाटी बसविली असून, ११ लाख पन्नास हजार वाहनधारकांनी ‘एचएसआरपी’साठी अर्ज केले आहेत. पुण्यात २४ लाख २८ हजार ५८९ गाड्यांना एचएसआरपी पाटी बसवणे बंधनकारक होते.

एचएसआरपी’ नसलेल्या वाहनांवर १ जुलैपासून प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाद्वारे कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, ‘एचएसआरपी’ नसलेल्या वाहनांचे हस्तांतर, कर्जबोजा चढविणे-उतरविणे, वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे, परवाना नूतनीकरण इत्यादी कामे थांबविण्यात येणार आहेत.

दरम्यान, ‘एचएसआरपी’ बसविण्यासाठी ३० जूनपूर्वी अर्ज केलेल्या वाहनांवर ही कारवाई करण्यात येणार नसल्याचे परिवहन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे

उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) ही केंद्र सरकारने सर्व वाहनांसाठी अनिवार्य केलेली आधुनिक नंबर प्लेट आहे. या प्लेटमध्ये लेझर-कोड, क्रोमियम होलोग्राम, कायमस्वरूपी स्नॅप लॉक आणि छेडछाड झाल्यास स्पष्ट दिसणारी सुरक्षा प्रणाली असते. त्यामुळे वाहनांची ओळख पटविणे, चोरी रोखणे आणि गुन्हे उघडकीस आणण्यास मदत होते. वाहनांची नोंद अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी ही प्रणाली लागू करण्यात आली आहे. जुन्या वाहनांनाही ही प्लेट बसविणे आता बंधनकारक असून नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर १ जुलैपासून प्रादेशिक परिवहन विभागाच्या विशेष पथकाकडून कारवाई सुरू होणार आहे. अशा वाहनांचे हस्तांतरण, पुनर्नोंदणी, वाहनातील बदलांची नोंद, कर्जबोजा चढविणे-उतरविणे तसेच फिटनेस किंवा इतर परवान्यांशी संबंधित अनेक सेवा रोखल्या जाऊ शकतात. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाईचीही तरतूद आहे. मात्र, ३० जूनपूर्वी एचएसआरपीसाठी अर्ज केलेल्या वाहनधारकांना तात्पुरता दिलासा देण्यात आला असून त्यांच्यावर तत्काळ कारवाई केली जाणार नाही. पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या हद्दीत सुमारे २४.२८ लाख जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविणे आवश्यक आहे. त्यापैकी आतापर्यंत नऊ लाखांहून अधिक वाहनांवर नंबर प्लेट बसविण्यात आली असून सुमारे ११.५० लाख वाहनधारकांनी अर्ज केले आहेत. तरीही जवळपास ५३ टक्के वाहनांवर अद्याप एचएसआरपी बसविण्यात आलेली नाही.




### ‘एचएसआरपी’ का गरजेची?

» एचएसआरपी अ‍ॅल्युमिनियमपासून बनवली जाते. या पाटीच्या डाव्या कोपऱ्यात युनिक लेसरने कोरलेला १० अंकी क्रमांक असतो. पाटीवर एक होलोग्राम देण्यात आला असून, त्यावर वाहनाची तपशीलवार माहिती असते. रात्रीच्या वेळी वाहन क्रमांक पाटी व्यवस्थित दिसावी म्हणून रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह फिल्म असते. या पाटीमुळे बनावट वाहन क्रमांकाची पाटी, फॅन्सी पाटी, वाहन क्रमांकाची खाडाखोड इत्यादी गोष्टी करता येत नाहीत. या पाटीमुळे चोरीला गेलेले वाहन शोधण्यास मदत होते.

### तक्रारींसाठी संपर्क

» ‘एचएसआरपी’साठी https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येते. ‘एचएसआरपी’ बसविण्याविषयी काही तक्रारी असल्यास dytccomp.tpt-mh@gov.in या ई-मेलवर संपर्क करण्याचे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे.

> ‘एचएसआरपी’ पाटी बसविण्यासाठी अजून मुदतवाढ देण्यात आली नाही. उद्या, १ जुलैपासून ‘एचएसआरपी’ नसलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे ‘एचएसआरपी’ पाटी बसविण्यासाठी वाहनधारकांनी आज तातडीने अर्ज करावेत
>
> - अर्चना गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# पावसाअभावी पुरंदरमध्ये भीषण पाणीसंकट; दुष्काळाचे सावट गडद

## पुढील 25 वर्षांचे आव्हानात्मक नियोजन! वाहतूक कोंडी, पर्यावरण ऱ्हास आणि पाणीटंचाईवर तोडगा काढण्यासाठी उच्चशिक्षित तज्ज्ञांची फौज मैदानात.

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्याचा एक महिना संपत आला तरी पुरंदर तालुक्यात पावसाने हजेरी लावलेली नाही. पिण्याच्या पाण्यासह शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. तालुक्यातील प्रमुख सासवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गराडे धरणासह इतर जलसाठ्यांतील पाणीसाठा तळाला गेला आहे. त्यामुळे तालुक्यावरील दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे

गराडे पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता अविनाश जगताप यांनी तालुक्यातील बहुतांश धरणांमध्ये पाणीसाठा अत्यल्प असून, अनेक जलस्रोत कोरडेठाक पडल्याचे सांगितले. त्यामुळे सासवड शहरासह ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठा योजनांवरही संकट ओढावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, पिण्याच्या पाण्याची टंचाई दिवसेंदिवस तीव्र होत असल्याने प्रशासनालाही टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. तालुक्यातील २४ गावठाणे आणि विविध वाड्या-वस्त्यांमध्ये सध्या ३२ शासकीय टँकरद्वारे दररोज ८५ खेपा करून नागरिकांसह जनावरांची तहान भागविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ऐन पावसाळ्यात टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आल्याने ग्रामीण भागातील परिस्थितीची गंभीर होत चालली आहे

जून महिना संपत आला तरी तालुक्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. परिणामी विहिरी, ओढे, नाले आणि लहान जलस्रोतांची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे. परिणामी, अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी पायपीट करावी लागत आहे. शेतीसाठीही पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या आहेत. पाऊस आणखी लांबल्यास त्याचा मोठा फटका बसण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.



### रखडल्या खरीप पेरण्या

» जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने पुरंदर तालुक्यातील शेतकरी चिंतेत आहेत. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेल्या पावसाअभावी अनेक ठिकाणी पेरण्या रखडल्या आहेत. विहिरी, ओढे आणि नाल्यांतील पाणीपातळी घटल्यामुळे सिंचनाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पाऊस आणखी उशिरा झाल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतीबरोबरच पशुपालन व्यवसायावरही याचा परिणाम होत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर पडसाद उमटण्याची शक्यता आहे.